# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३१४ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## 'मर्यादेत बोला' सल्ल्यावर राष्ट्रवादीचा पलटवार

### नवनीत राणांची लायकी काढली



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत विरोधकांऐवजी महायुतीतील घटक पक्षांमध्येच शब्दयुद्ध पेटले आहे. सत्तेत एकत्र असले तरी प्रचाराच्या मैदानात आरोपप्रत्यारोपांची पातळी घसरत चालली असल्याचे चित्र आहे. पिंपरी-चिंचवडमधील सभेतून उपमुख्यमंत्री यांनी केलेल्या आरोपांमुळे भाजप अस्वस्थ झाला असतानाच, माजी खासदार यांनी 'मर्यादेत बोला' असा सल्ला देत वादात उडी घेतलीआणि राष्ट्रवादीकडून तिखट प्रतिहल्ला झाला.नवनीत राणांच्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संतापले. ''आता त्या पुढे कशा निवडून येतात, ते आम्ही पाहू,'' असा गर्भित इशारा देत खोडकेंनी राणांची 'लायकी'च काढली. ''लोकसभा निवडणुकीत अजितदादांनी रोखले नसते, तर त्या खासदार झाल्याच नसत्या,'' असे सांगत ''एकदा निवडून आणणे ही आमची चूक होती,'' अशी कठोर टीकाही करण्यात आली.

महापालिका निवडणूक एकत्र लढवण्याची घोषणा महायुतीने केली असली, तरी अनेक महापालिकांत युतीची घडी विस्कटलेलीच दिसते. अमरावतीमध्ये तर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि युवा स्वाभिमानी पक्ष (आमदार रवी राणा) एकमेकांसमोर ठाकले आहेत. 'आपसात टीका नको' असा निर्णय झाल्याचा दावा असला, तरी प्रत्यक्षात नेते पातळी सोडून आरोप करताना दिसत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या समन्वय बैठकीत 'मनभेदमतभेद टाळा' असा सूर ठरवला गेल्याचा दावा आहे. मात्र, पुणेपिंपरीत अजित पवार आणि भाजप प्रदेशाध्यक्ष यांच्यात थेट भ्रष्टाचाराचे आरोप झालेआणि वादाची धग वाढली.

**नवनीत राणांची उडी; समर्थक भडकले**

या पार्श्वभूमीवर नवनीत राणांनी अजित पवारांना शब्द जपून वापरण्याचा सल्ला दिला. तोच राष्ट्रवादीसाठी लाल रेषा ठरला. दादांचे समर्थक भडकले आणि खोडकेंनी राणांच्या वक्तव्याचा समाचार घेतला''आरोप करताना पात्रता तपासा,'' असा टोला देत.

विशेष म्हणजे, नवनीत राणांना भाजपच्या स्थानिक नेत्यांचाही विरोध असल्याची चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर महापालिका रणधुमाळीत युवा स्वाभिमानी पक्षाशी युतीवर भाजप कार्यकर्त्यांमध्येही मतभेद उफाळले आहेत.

## बिनविरोधांच्या विरोधात मनसे हायकोर्टात

### लोकशाही धोक्यात असल्याचा गंभीर आरोप



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

महानगरपालिका निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या बिनविरोध निवडींमुळे लोकशाहीच्या मुळावरच घाव बसत असल्याचा आरोप करत मनसेने थेट न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे. मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी या प्रकरणी याचिका दाखल केली असून, बिनविरोध निवड प्रक्रियेची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

ही याचिका ज्येष्ठ विधिज्ञ एडवोकेट असीम सरोदे यांच्या माध्यमातून दाखल करण्यात आली आहे.

याचिकेत मनसेने गंभीर आरोप करत म्हटले आहे की, अनेक महानगरपालिकांमध्ये बिनविरोध निवडी या स्वतःहून झालेल्या नाहीत, तर त्यामागे दबाव, धमक्या, आर्थिक व्यवहार आणि राजकीय सेटलमेंट्स असल्याचा संशय आहे.

मनसेने याचिकेत ठामपणे नमूद केले आहे की, निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया आहे. मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्याची संधी मिळणे हे संविधानिक मूल्य आहे. मात्र, बिनविरोध निवडींच्या नावाखाली मतदारांचा हक्क हिरावून घेतला जात आहे.

विशेषतः महानगरपालिका निवडणुकांसारख्या शहरी स्वराज्य संस्थांमध्ये असे प्रकार घडणे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक असल्याचा इशारा मनसेने दिला आहे. या याचिकेमुळे केवळ राजकीय पक्ष नव्हे, तर निवडणूक यंत्रणांची भूमिकाही चर्चेच्या भोवऱ्यात आली आहे. बिनविरोध निवडींची संख्या सातत्याने वाढत असताना वेळीच हस्तक्षेप का केला गेला नाही?, असा सवाल मनसेकडून उपस्थित करण्यात आला आहे. निवडणूक आयोग आणि स्थानिक निवडणूक यंत्रणांनी या प्रक्रियेवर डोळेझाक केली का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

मनसेच्या या आक्रमक भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. बिनविरोध निवडींमुळे अनेक ठिकाणी आधीच 'सेटलमेंट राजकारण' असल्याच्या चर्चा सुरू होत्या. आता या चर्चांना कायदेशीर व्यासपीठ मिळाल्याने पुढील काही दिवसांत हे प्रकरण अधिक तापण्याची शक्यता आहे. महानगरपालिका निवडणुकांतील बिनविरोध उमेदवारांची वाढती संख्या ही केवळ आकड्यांची बाब नाही, तर लोकशाहीच्या आरोग्याचा प्रश्न आहे. मनसेने हायकोर्टात दाखल केलेली ही याचिका निवडणूक प्रक्रियेतील अंधाऱ्या कोपऱ्यांवर प्रकाश टाकणार का, की केवळ राजकीय आरोपप्रत्यारोपांपुरतीच मर्यादित राहणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आता या प्रकरणात न्यायालय काय भूमिका घेते, यावरच लोकशाहीच्या 'बिनविरोध' भविष्याचा फैसला होणार आहे.

**हायकोर्टाकडे मनसेच्या ठोस मागण्या**

याचिकेद्वारे मनसेने न्यायालयाकडे पुढील महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यात, बिनविरोध उमेदवार निवडण्यामागची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक होती का, याची चौकशी करण्यात यावी. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव, धमकी किंवा आर्थिक प्रलोभन वापरले गेले का, याचा तपास व्हावा. भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर नियम व मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात यावीत. मतदारांचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहील, याची खात्री करणारे उपाय सुचवण्यात यावेत या मागण्यांचा समावेश आहे.

## महायुतीकडून मतदानाआधीच घोडेबाजार : हर्षवर्धन सपकाळ



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मुक्त आणि पारदर्शक निवडणुकीच्या धोरणाला हरताळ फासला आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी लोकशाही गुंडाळून टाकल्याने पैशाचा खेळ सुरु आहे. मतदानाआधीच घोडेबाजार सुरु असून भाजप महायुतीची सत्तेची भूक लोकशाही गिळंकृत करण्यापर्यंत पोहचली आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी येथे केली.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान होत आहे. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी अनेक ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी महायुतीवर जोरदार टीका केली.

निकोप लोकशाहीत विरोधी पक्षांनाही तेवढेच महत्व आहे. पण आता विरोधकच नको अशी प्रवृत्ती भाजप आणि महायुतीची बनली असून त्यातून बिनविरोधसाठी सत्ताधारी कोणत्याही स्तराला जात आहेत. विरोधी पक्षांच्या उमेदवाराला अर्ज भरू न देणे, धमक्या देणे, दबाव तंत्राचा वापर करणे असा पोलीस, प्रशासनाच्या मदतीने बेशरमपणाचा खेळ सुरु आहे. निवडणूक आयोग मात्र याचा मूक साक्षीदार बनला आहे, अशी खंत सपकाळ यांनी व्यक्त केली.

.. तर अजित पवारांनी बाहेर पडावे महापालिका निवडणुकीत सत्तेतील तीन पक्ष एकमेकांच्या समोर उभे ठाकले असून तेच एकमेकांवर टीका करत आहेत. हा प्रकार म्हणजे 'मी मारल्यासारखे करतो, तू रडल्यासारखे कर' असा आहे. त्यामुळे भाजपवर आरोप करणाऱ्या अजित पवार यांनी सत्तेतून बाहेर पडावे नाहीतर भाजपने तरी अजित पवार यांनी बाहेरचा रस्ता दाखवावा, असे सपकाळ म्हणाले.

**राहुल नार्वेकरांवर कारवाई करा**

संवैधानिक पदावरील व्यक्तीने राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवणे अपेक्षित आहे. मात्र, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पदाची प्रतिष्ठा घालवली आहे. हे महाशय महापालिकेच्या निवडणुकीत आपल्या नातेवाईकांसाठी अत्यंत खालच्या पातळीवर उतरले आहेत. विरोधकांना अर्ज भरू देण्यात अडथळा आणणे, विरोधकांना धमक्या देणे, पदाचा गैरवापर करणे अशा प्रकारचे वर्तन नार्वेकर यांनी केल्याने केल्याने त्यांच्यावर कारवाई करावी, या मागणीचा पुनरुच्चार हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केला.

## जेसीबीच्या धडकेने पोलिस शिपाई मृत

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५**

दुचाकीवर बसलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला जेसीबीची धडक बसल्याने त्यांचा मृत्यू झाला.

जगदीश शामराव गेडेकर (४९) रा. शंकरनगर, शिव कॉलनी असे मृताचे नाव असून ते शहर पोलिस मुख्यालयात हवालदार म्हणून कार्यरत होते.

३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास ते दुचाकीने नरसाळा रोडवरील ब्रम्हनगर टी पॉईंट येथे आले होते. दुचाकी उभी करून ते सिटवर बसले. तोच पिवळ्या रंगाच्या जेसीबीचालकाने आपले वाहन निष्काळजीपणाने चालवून गेडेकर यांना धडक दिली.

## काल राजकीय निवृत्तीचे संकेत, आज नारायण राणेंना भर स्टेजवर भोवळ



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

भाजपचे ज्येष्ठ नेते व खासदार, माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी कालच राजकीय संन्यास घेण्याचे संकेत दिल्यानंतर आज चिपळूणमधील कार्यक्रमात त्यांची प्रकृती बिघडल्याची घटना घडली आहे. कृषी महोत्सवाच्या कार्यक्रमादरम्यान भाषण करत असताना नारायण राणेंना चक्कर आल्याने कार्यक्रमस्थळी एकच धावपळ उडाली.

भाषणाच्या अखेरच्या टप्प्यात राणेंचा आवाज बसल्याचं दिसून आलं. चक्कर येत असल्याची भावना झाल्यानंतर त्यांनी भाषण तात्काळ आटोपत घेतलं. प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांनी माध्यमांशी संवाद साधण्यास नकार दिला.

कार्यक्रमस्थळावरून नारायण राणे थेट विश्रामगृहाकडे रवाना झाले. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी तसेच मोठा पोलीस बंदोबस्त होता. अनेक कार्यकर्त्यांनी त्यांची काळजी घेतली.

दरम्यान, काल सिंधुदुर्गातील सभेत बोलताना नारायण राणे यांनी राजकीय निवृत्तीचे स्पष्ट संकेत दिले होते. वय झालं असल्याने आता थांबायला हवं, दोन्ही मुले राजकारणात स्थिर झाली आहेत आणि उद्योग सांभाळण्यासाठीही कुणीतरी पाहिजे, असं ते म्हणाले होते.

## उद्धव ठाकरेंवर शिरसाटांचा हल्लाबोल

### 'तोफ थंड, आता फक्त कॉर्नर मीटिंग'



**छ. संभाजीनगर, दि. ५**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असताना मंत्री संजय शिरसाट यांनी आज उद्धव ठाकरे आणि एमआयएमवर जोरदार शब्दांत टीका केली. एकेकाळी 'तोफ' म्हणून ओळखले जाणारे नेते आता निष्प्रभ झाले असून, त्यांच्याकडे सध्या केवळ कॉर्नर मीटिंग हाच पर्याय उरला आहे, असा टोला शिरसाट यांनी लगावला. अहंकारामुळेच त्यांच्यावर ही वेळ आल्याचेही त्यांनी म्हटले.

एमआयएमवर निशाणा साधताना शिरसाट म्हणाले की, हैदराबादचे नेते येथील तरुणांची डोकी भडकवण्याचे काम करत आहेत. दंगली घडवल्याशिवाय निवडणूक जिंकता येत नाही, अशी त्यांची मानसिकता असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र त्यांनी इतिहास विसरू नये, वल्लभभाई पटेल यांनी एका दिवसात त्यांची नवाबगिरी संपवली होती आणि आम्ही त्यांचेच वारसदार आहोत, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी हिंदू मतदारांना सावध राहण्याचे आवाहन करत, एमआयएम हीच आमची मुख्य विरोधक असून 'उबाठा' ही त्यांची बी-टीमअसल्याचा आरोप केला.

निवडणूक आयोगाने आचार-संहितेच्या नावाखाली बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा झाकल्याच्या निर्णयावरही शिरसाट यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. बाळासाहेब आमचे दैवत असून त्यांचा पुतळा झाकणे अयोग्य असल्याचे सांगत, आयोगाने असे करू नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, नारायण राणे यांच्याशी संबंधित एका जुन्या घटनेचा उल्लेख करताना शिरसाट यांनी, 'साहेबांचा शब्द' शिवसैनिकांसाठी अंतिम असायचा, याची आठवण करून दिली. बाळासाहेबांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील शिस्त आणि निष्ठेचे उदाहरण त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

## एसटी ताफ्यात ८ हजार नव्या बसेस दाखल करा : सरनाईक



**मुंबई, दि. ५**

सन २०२६ अखेरपर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात ८ हजार नवीन बसेस दाखल होतील अशा पद्धतीने सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया तातडीने गतिमान करण्यात यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नसून, कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला.

ते एसटी महामंडळाच्या सन २०२५२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत बोलावण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक , आर्थिक सल्लागार तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री सरनाईक यांनी एसटी महामंडळातील विविध विभागांकडून सुरू असलेल्या संथ व कूर्मगती कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, सन २०२५२६ च्या अर्थसंकल्पात एसटीसाठी शासनाने २,४६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र आर्थिक वर्ष संपण्यास केवळ तीन महिने शिल्लक असताना त्यापैकी सुमारे १,६०० कोटी रुपये खर्चाविना परत जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे.हा निधी सर्वसामान्य जनतेच्या करातून आलेला असून, तो नवीन बसेस खरेदी, बसस्थानकांची उभारणी, दुरुस्ती व नूतनीकरण, प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा यासाठीच वापरला गेला पाहिजे.

## इंस्टाग्राम स्टोरी पोलिसांसाठी ठरली महत्वपूर्ण धागा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५**

मागील ४ महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या मुलीचा इंस्टाग्रामच्या मदतीने शोध घेण्यात वाठोडा पोलिसांना यश आले असून पोलिसांनी एका आरोपीला अटक करीत मुलीची सुखरूपपणे सुटका केली.

मयूर रमेश वघरे (२२) म्हसगाव, ता. गोरेगाव (गोंदिया) असे आरोपीचे नाव आहे.

मागील चार महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या १५ वर्षीय मुलीचा शोध अखेर नागपूर पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि धाडसी कारवाईत यशस्वीरीत्या लावला आहे. सदर मुलगी मागील चार महिन्यांपासून बेपत्ता होती. तिचा वर्धा, गोंदिया, व नागपूर ग्रामीण या सर्वत्र शोध घेण्यात आला, मात्र कोणताही ठोस धागा मिळून येत नव्हता. दरम्यान, आरोपी हा वाय-फायच्या माध्यमातून इंस्टाग्राम वापरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तीन दिवसांपूर्वी आरोपीने आपल्या मित्राला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत इंस्टाग्रामवर स्टोरी टाकली. ही स्टोरी पोलिसांसाठी निर्णायक ठरली. सदर स्टोरी पाहून पोलिसांनी संबंधित आरोपीच्या मित्राला विश्वासात घेऊन आरोपीशी इंस्टाग्रामवर संपर्क साधण्यास सांगितले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिशकुमार बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली एक अत्यंत नियोजनबद्ध सापळा रचण्यात आला. यामध्ये वाठोडा पोलीस ठाण्याच्या मपोशी मयुरी (ब.नं. १८१४७) यांनी आरोपीच्या मित्राच्या मैत्रिणीची भूमिका स्वीकारली. आरोपीशी संपर्क साधून आम्ही घरातून पळून आलो असून पोलिस आमच्या मागे लागले आहेत, फक्त दोन दिवस लपण्यासाठी जागा द्या अशी भावनिक विनंती करण्यात आली. सुरुवातीला आरोपी लोकेशन देण्यास टाळाटाळ करत होता, मात्र सतत संवाद साधून त्याला पूर्णपणे विश्वासात घेण्यात आले.

पुणे बस स्थानकात आरोपीने तब्बल १२ तास वाट पाहायला लावली, त्यानंतर बारामती येथे येण्यास सांगितले. बारामती येथेही ६ तास प्रतीक्षा केल्यानंतर अखेर भवानीनगर येथे सापळा लावून आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

त्यांचे मार्गदर्शनाखाली झडख अमोल पाटील, पोअ कैलास श्रावणकर (ब.नं. ७१६७), मपोशी मयुरी व खाजगी इसम (आरोपीचा मित्र) असे पथक पुण्याकडे रवाना झाले. पुणे बस स्थानकात आरोपीने तब्बल १२ तास वाट पाहायला लावली, त्यानंतर बारामती येथे येण्यास सांगितले. बारामती येथेही ६ तास प्रतीक्षा केल्यानंतर अखेर आरोपीने भवानीनगर बस स्टॉप, इंदापूर येथे बोलावले. दरम्यान आरोपीने इंस्टाग्राम व्हिडिओ कॉल करून खात्री केली. पोलिसांनी एसटी बसमधून कॉल अटेंड करत आपली भूमिका अत्यंत सफाईदारपणे निभावली. अखेर भवानीनगर येथे सापळा लावून आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

पोलीस खाक्या दाखवताच आरोपीने सत्य उघड केले आणि पीडित १५ वर्षीय मुलगीही सुखरूप सापडली.

मुलगी मिळून आल्याची माहिती तिच्या आईला फोनवर देण्यात आली असता, त्यांनी भावूक होत पोलीस खात्याला सलाम आहे, हे उपकार आम्ही आयुष्यभर विसरणार नाही अशा शब्दांत नागपूर पोलिसांचे आभार मानले.

या संपूर्ण कारवाईत मपोशी मयुरी यांनी साकारलेली बनावट भूमिका अत्यंत कौतुकास्पद असून त्यांच्या धैर्य, संयम व अभिनयामुळे ही कारवाई यशस्वी ठरली.

यातील आरोपी मयूर रमेश वघरे वय २२ वर्षे रा म्हसगाव ता गोरेगाव जि गोंदिया यास अटक करण्यात आली असून माननीय न्यायालयात पेश केली असता अधिक तपासासाठी दोन दिवसांचा पोलीस कस्टडी रिमांड मंजूर झाला आहे.

नागपूर पोलिसांच्या या धाडसी, तांत्रिक व मानवी संवेदनशीलतेने केलेल्या कारवाईमुळे पंधरा वर्षाची पीडित मुलगी सुखरूपतीच्या कुटुंबीयांमध्ये परत आली आहे.




दैनिक युवाराष्ट्र दर्शन
# यवतमाळ
मंगळवार, ६ जानेवारी २०२६ जिल्हा



दर्पणकार
आचार्य बाळशास्त्री जांभेकर
यांच्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन !

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुलमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### दुचाकीची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन बाभुळगाव : पोलीस स्टेशन अंतर्गत विरखेड येथे दुचाकी चोरीची घटना घडली आहे. फिर्यादी राहुल बाबाराव आडे (३०, रा. सावंगी मांग) यांची एम एच- १२ जे.जे. ८९०९ क्रमांकाची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना ३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:00 वाजताच्या सुमारास घडली. चोरीला गेलेल्या या दुचाकीची किंमत १५,000 रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. राहुल आडे यांच्या फिर्यादीवरून बाभुळगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ३०३(२) भान्यासं अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### वृद्धेला लुटले

•युवाराष्ट्र दर्शन दिग्रस : तालुक्यातील कलगाव येथे दोन अज्ञात आरोपींनी ७५ वर्षीय वृद्धेला लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. निर्मला नानाजी रननवरे यांच्या अर्धवट बांधकाम झालेल्या घरात आरोपींनी भिंतीमधून प्रवेश केला. आरोपींनी फिर्यादीच्या बाजेवर बसून त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली आणि १५,000 रुपये किमतीची सोन्याची पोत व रोख ८५,000 रुपये, असा एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना ३ जानेवारीच्या मध्यरात्री घडली. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटरची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन आर्णी : पोलीस स्टेशनच्या हद्दीतील देवुरवाडी येथे शेतातील मोटर चोरीला गेल्याची घटना घडली आहे. मोतीराम गोविंदा गावंडे (६०) यांनी पिकांना पाणी देण्यासाठी आपल्या शेतात ५ एचपी (एच) क्षमतेची पाण्याची मोटर लावली होती. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:१५ वाजताच्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्याने २०,000 रुपये किमतीची ही मोटर चोरून नेली. गावंडे यांच्या तक्रारीवरून आर्णी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३०३(२) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### सहा गोवंशाची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन उमरखेड: तालुक्यातील ब्राम्हणगाव येथे जनावरांच्या चोरीची घटना घडली आहे. फिर्यादी संतोष गंगाराम हुलकाने (४२) यांनी ब्राम्हणगाव ते बोरी रोडवरील मोकळ्या जागेत आपली जनावरे बांधून ठेवली होती. ३ जानेवारीच्या रात्री ते ४ जानेवारीच्या सकाळदरम्यान अज्ञात चोरट्याने तेथून तीन गायी आणि तीन गोरे, असा एकूण ७५,000 रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी ३०३(२) भान्यासं अंतर्गत गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे.

### कुऱ्हाडीने हल्ला

पारवा: घांटजी तालुक्यातील सोनखास येथे जुन्या वादातून एका व्यक्तीवर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला. फिर्यादी स्वामी रमलु मॅकलवार (५०) हे रात्री आपल्या भावाच्या घराकडे का गेले, या कारणावरून आरोपी दीपक भवरे व इतर तिघांनी त्यांच्याशी वाद घातला.

# नायलॉन मांजावर कारवाई करा

## यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसकडून शहर व अवधूतवाडी पोलीस ठाण्यात निवेदन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि.५ जानेवारी**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाच्या वापरामुळे मानव,पशुपक्षी व पर्यावरणाला होणाऱ्या गंभीर धोक्याच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आज (सोमवार),दिनांक 5 जानेवारी रोजी यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक प्रमोद बगाडे यांच्या नेतृत्वात शहर पोलीस ठाणे व अवधूतवाडी पोलीस ठाणे येथे ठाणेदारांना निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात नमूद करण्यात आले की,मकर संक्रांतीदरम्यान पतंग उडविण्याच्या उत्साहात नायलॉन मांजाचा सर्रास वापर होत असून यामुळे दुचाकीस्वार, पादचारी जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. तसेच पक्षी व प्राणी मृत्युमुखी पडण्याचे प्रकार वाढले असून नायलॉन मांजा जैवविघटन न होणारा असल्याने पर्यावरणावर दीर्घकालीन दुष्परिणाम होत आहेत. शासनाने नायलॉन मांजाच्या वापरावर बंदी घातलेली असतानाही काही ठिकाणी त्याची खुलेआम विक्री व वापर सुरू असल्याबाबत युवक काँग्रेसने तीव्र चिंता व्यक्त केली. युवक काँग्रेसच्या वतीने पोलिस प्रशासनाकडे नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, शहरातील प्रमुख चौक व संवेदनशील ठिकाणी विशेष पथके तैनात करणे, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सूचना व आवाहन जारी करणे,तसेच मकर संक्रांतीच्या कालावधीत नियमित गस्त वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी युवक काँग्रेसचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे, अथर्व भोयर, अनिकेत जीवतोडे, प्रतीक नारलावार यांची उपस्थिती होती. पोलिस प्रशासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# आरोग्य दिनदर्शिका 2026 वर्ष १५ वे या दिनदर्शिका विमोचन कार्यक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ५ जानेवारी**

आज आरोग्य दिनदर्शिका 2026 वर्ष १५ वे या दिनदर्शिका विमोचन कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सतीश कोडापे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी तथा संघटक मॅग्मो संघटना प्रमुख अतिथी डॉ. संघर्ष राठोड, तालुका आरोग्य अधिकारी बाभुळगाव तथा राज्य प्रतिनिधी मॅग्मो संघटना आणि सुनिता फड संघटनेच्या राज्य कार्याध्यक्ष यांचेसह संघटनेचे पदाधिकारी सदस्य कर्मचारी यांच्या उपस्थितीत विमोचनाचा कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमांमध्ये प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अनंत सावळे यांनी केले. डॉ.संघर्ष राठोड, सतीश कोडापे यांनी मनोगत व्यक्त केले. राज्य कार्याध्यक्ष सुनीताताई फड, कोषाध्यक्ष विक्रम महाजन, उपाध्यक्ष ज्ञानदिप भगत, सविता पारधी यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबीत समस्या, प्रश्नावर आणि संघटनेचे सन २०२६ मधील कर्तव्य दिशाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संघटनेचे सरचिटणीस उमेश सरोदे यांनी आभार प्रदर्शन तर प्रसिद्धी प्रमुख राजरत्न भालेराव यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ठ संचालन केले. कार्यक्रमांमध्ये नवनियुक्त कृणाल पानोडे, संघटनप्रेमी आशिष निकुरे, नव्याने पदोन्नत राजरत्न भालेराव यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमानंतर लगेच सर्वांनी स्वरूची भोजनाचा आनंद घेतला.

योगेश वाघे, भारत भुसेवाड, वर्षा वाघमारे, आशा चिंडाले, ममता शेलारे, विनोद कराळे, पवन आभारे, मनीष पोटदुखे, सौरव बानोरे यांचे सहकार्याने कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

# परसोडा ग्रामपंचायतद्वारा प्लास्टिक बंदीचा अभिनव उपक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. ५ जानेवारी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत परसोडा ग्रामपंचायतमध्ये प्लास्टिक बंदीचा ठराव घेण्यात आला त्याचे अंमलबजावणीचा भाग म्हणून अंजली ड्रेसेसच्या वतीने ग्रामस्थांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे ह्यांचे हस्ते व अंजली ड्रेसेसचे संचालक राजेश श्रीवास यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये कापडी पिशवीचे वाटप करण्यात आले. गावातून प्लास्टिक हद्दपार करणे करिता परसोडा ग्रामपंचायत द्वारे प्लास्टिक बंदीचा ठराव घेण्यात आला होता त्याची योग्य अशी अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने अंजली ड्रेसेसचे संचालक राजेश श्रीवास यांनी ग्रामस्थांना कापडी पिशवीचे वाटप करण्याचा निर्णय घेतला होता. जिल्हा परिषद चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे ह्यांचे हस्ते परसोडा ग्रामपंचायतचे कार्यालयात कापडी पिशवीचे वाटप करण्यात आले.



ह्यावेळी गटविकास अधिकारी रमेश खारोडे, बघेल विस्तार अधिकारी, ठाकरे विस्तार अधिकारी, जय राठोड मनरेगा कार्यक्रम अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती तर माजी सरपंच अतुल पाटील देशमुख, अरुण देशमुख, बाबाराव वानखडे मुख्याध्यापक, नारायण वेट्टी साहाय्य शिक्षक, ज्ञानेश्वर मिसाळ, शंकर कोल्हे, गजानन शेळके, पंकज राठोड, स्वप्नील रोहिदास राठोड, कुंदन पवार, कैलास जाधव, अमोल कोल्हे, दादाराव पारधी, भगवान पोटे, रामकृष्ण ढोके, प्रविण राठोड, राहुल तुवर, रोहिदास तुवर, पुष्पा जाधव, चंदा जाधव यांची उपस्थितीत कार्यक्रम पार पाडला कार्यक्रमाचे संचलन ग्राम विकास अधिकारी दिग्विजय मुंडवाईक यांनी केले.

# उमेद २०२५ – शिस्त, शक्ती आणि संस्कारांचा उत्सव”

## शंकरलाल कोठारी विद्या मंदिरात वार्षिक क्रीडा दिन उत्साहात : थरारक कवायतीने लक्ष वेधले

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ५ जानेवारी**

शंकरलाल कोठारी विद्या मंदिर व गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, कोठारी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी “उमेद २०२५ – शिस्त, शक्ती आणि संस्कारांचा उत्सव” या भव्य वार्षिक क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम झाशी राणी मैदान, यवतमाळ येथे उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी अशोकराव उईके उपस्थित होत्या. मुख्य पाहुणे म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी किशोर पागोरे उपस्थित होते. कार्यक्रमास शक्ती सेवा प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अनुप कोठारी, सदस्य मनजित अनुप कोठारी,





शंकरलाल कोठारी विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका अर्चना अनुप कोठारी, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका वैशाली चांडक, पर्यवेक्षक गणेश सोनर, प्री-प्रायमरी हेड गीता पाठक, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलच्या पर्यवेक्षिका सुषमा मुंदाने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व रंगीत ड्रिल सादर करून प्रेक्षकांचे मन जिंकले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले “मानवी मनोरे”, ज्याने उपस्थितांचे लक्ष वेधले आणि विद्यार्थ्यांच्या संघभावना, धैर्य व समन्वयाचे उत्कृष्ट दर्शन घडवले. हा क्रीडा दिन विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता, आत्मविश्वास, शिस्त आणि संघभावना वृद्धिंगत करणारा ठरला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे भरभरून कौतुक केले आणि भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आज बोरगाव येथे ‘ऑपरेशन प्रस्थान’ कार्यक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ५ जानेवारी**

यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे आर्णी तालुक्यातील बोरगाव येथील शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयात आज ‘ऑपरेशन प्रस्थान’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत शालेय मुलींच्या स्वसंरक्षण कौशल्यांचा विकास व सक्षमीकरणाच्या दृष्टीने विविध विषयांवर जनजागृती करण्यात येणार आहे. कार्यक्रमामध्ये कराटे प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, वाहतूक नियम, नागरी शिस्त, महिलांसंबंधी कायदे तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि सुरक्षिततेबाबत सजगता वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून ‘ऑपरेशन प्रस्थान’ हा उपक्रम दोन दिवस चालणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना दैनंदिन जीवनात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यास आवश्यक कौशल्ये आणि माहिती दिली जाणार आहे.दरम्यान. दामिनी पथक प्रमुख दीपमाला भेंडे,जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय जनसंपर्क अधिकारी एपीआय शुभांगी गुल्हाने आणि आर्णीचे ठाणेदार निलेश सुरडकर यांनी बोरगांव येथिल शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रगती व्यवहारे यांची भेट घेऊन परिसराची पाहणी केली.



# स्व. गुलाबसिंग ठाकूर यांना अभिवादन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. ५ जानेवारी**

येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय गुलाबसिंगजी ठाकूर यांच्या ४८ व्या स्मृतिदिनानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने वारकरी संप्रदायाने स्वर्गीय ठाकूर यांच्या प्रतिमेची भव्य दिंडी काढली होती.

स्वर्गीय गुलाबसिंग ठाकूर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी काढण्यात आलेल्या या फेरीत वारकरी संप्रदायाचे भजनी मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनी, शिक्षक आणि कर्मचारी यांनी या फेरीत सहभाग घेऊन शिस्तबद्ध संचलन केले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि "विठ्ठल-विठ्ठल" च्या जयघोषात निघालेली ही फेरी शहराचे मुख्य आकर्षण ठरली.



फेरीनंतर कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयामध्ये एक छोटेखानी कार्यक्रम पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय ठाकूर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मण रावते, ढाणकीच्या नगराध्यक्षा अर्चना वासमवार आणि बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव आनंद शेवाळकर, सहसचिव किशोर ठाकूर, रमण रावते, रमेश पांडे, संभाजी उपेवाड, केशव बिरबलवाड, संभाजी ताटीकुंडलवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कस्तुरबा गांधी कन्या वि द्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली शाळेच्या शिक्षक सूर्यवंशी, प्रा. गवई, प्रा.झिंगरे, गोरे, आलोने, शहापुरे , रावते व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. स्वर्गीय गुलाबसिंग ठाकूर यांनी शिक्षण क्षेत्रात घातलेल्या पायाभरणीमुळेच आज परिसरातील हजारो विद्यार्थी ज्ञानार्जन करत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. मान्यवरांच्या मार्गदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# यवतमाळ हेल्थ मॅरेथॉनची चौथी आवृत्ती उत्साहात संपन्न

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी | यवतमाळ दि. ५ जानेवारी**

यवतमाळ शहराची आरोग्यविषयक ओळख ठरलेली यवतमाळ हेल्थ मॅरेथॉनची चौथी आवृत्ती नेहरू स्टेडियम येथे आणि परिसरात मोठ्या उत्साहात पार पडली. या मॅरेथॉनमध्ये तब्बल २८०० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील धावपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते.



या मॅरेथॉनमध्ये २१ किलोमीटर, १० किलोमीटर, ५ किलोमीटर फिटनेस रन, ३ किलोमीटर फन रन तसेच लहान मुलांसाठी स्वतंत्र ५ किलोमीटर चिल्ड्रन्स रन अशा विविध कॅटेगिरी ठेवण्यात आल्या होत्या. मॅरेथॉनची सुरुवात नेहरू स्टेडियम येथून होऊन तहसील चौक, एलआयसी चौक, कलेक्टर ऑफिस बंगला, पोस्ट ऑफिस, स्टेट बँक चौक मार्गे धामणगाव रोडवरील तरडगाव घाटातील वाघाई मंदिराजवळ U-Turn घेऊन पुन्हा नेहरू स्टेडियम येथे सर्व कॅटेगिरींची समाप्ती झाली.

सकाळी ५ वाजताच धावपटू आणि नागरिकांची मोठी गर्दी नेहरू स्टेडियमच्या दिशेने येण्यास सुरुवात झाली होती. ५.३० वाजता प्रेरणादायी संगीतासह झुंबा व स्ट्रेचिंग सेशन पार पडले. त्यानंतर विविध कॅटेगिरींना ठरलेल्या वेळेनुसार फ्लॅग-ऑफ देण्यात आला.

या मॅरेथॉनचे विशेष आकर्षण म्हणजे यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्वतः २१ किमी हाफ मॅरेथॉन पूर्ण केली. विविध शर्यतींना हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ मुख्य अतिथी अनिरुद्ध बक्षी (RDC), योगेश देशमुख, तहसीलदार डॉ. सुरेंद्र भुयार, वैद्यकीय अधीक्षक, आयपीएस सारडा, गोपाळ देशपांडे (SDO) यांच्या हस्ते करण्यात आला. यवतमाळ.पोलिस दलातील जवळपास 600. पोलिस आज मॅरेथॉन मध्ये सहभागी झाले होते. यावर्षी ऑपरेशन प्रस्थान सोबत ही मॅरेथॉन घेण्यात आली होती. शर्यत पूर्ण केलेल्या सर्व धावपटूंना मेडल व नाश्ता देण्यात आला. त्यानंतर पोलीस अधीक्षक कुमार चिंता व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अमरावती, वर्धा, बुलढाणा, हिंगोली, गडचिरोली पुसद आदी आजूबाजूच्या शहरांमधील विविध रनिंग ग्रुप्सनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

### विजेते

२१ किलोमीटर (पुरुष १८-४५ वर्षे) आवेज चव्हाण, अर्जुन साळवे कल्याणकुमार कारू

२१ किलोमीटर (महिला १८-४० वर्षे) : प्रणाली शेगावकर, प्रीती ढाकरगे, उज्वला चामटकर

२१ किलोमीटर (पुरुष ४५ वर्षांवरील) : स्वप्नील बनकर, देविदास राठोड, दत्ता सोनावले

२१ किलोमीटर (महिला ४० वर्षांवरील) मिनाजी नादाफ, अर्चना कन्नमवार, डॉ. अनिता राठोड

१० किलोमीटर (पुरुष १८-४५ वर्षे) : गौरव पवार, प्रणव राठोड, गजानन साखरकर

१० किलोमीटर (महिला १८-४० वर्षे) प्रांजली चव्हाण, गायत्री मोखाडकर, सुलोचना टेकाळे

५ किलोमीटर (पुरुष १५ वर्षांवरील) : रोशन राठोड, सूरज वाघमारे, जय पवार

५ किलोमीटर (महिला १५ वर्षांवरील): काजल दोनोडे, नव्या चिताडे, प्रगती जाधव

# रॉडने तरुणाला मारहाण

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी :**

वणी येथील लालपुलीया जवळील एका हॉटेलसमोर किरकोळ कारणावरून मारहाण झाल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी मारोती कंठीराम डीकळे (३५, रा. नांदेड) यांना आरोपी प्रविण प्रकाश राक्षसमारे याने विनाकारण शिवीगाळ करून वाद घातला.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यावर व हाताच्या मनगटावर प्रहार करून जखमी केले. ही घटना ३ जानेवारीच्या रात्री ११:०० वाजता घडली. वणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

**CHANGE OF NAME**
**OLD NAME**
AS PER PASSPORT NO: 0505529
**MOHAMMAD ASIF ABDUL LATIF ISANI**
**NEW NAME**
AS PER ADHAR & PAN CARD
**ASIF ABDUL LATIF ISANI**
ADDRESS: Taj Nagar Digras TQ Digras
Dist Yavatmal

(४) युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया जिल्हा
मंगळवार, ६ जानेवारी २०२५

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# नवेगाव–नागझिरा बफर झोनच्या विस्तारामुळे जांभळीवासियात संभ्रम

## आदिवासी ग्राम व्याघ्र प्रकल्पाच्या कचाट्यात

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सडक अर्जुनी :** नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे प्रभावी व्यवस्थापन व एकसंघ प्रशासकीय नियंत्रण अमलात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने २६ डिसेंबर २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयानुसार गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकूण १२४१.२७३ चौरस किलोमीटर क्षेत्र नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे बफर क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

या अधिसूचित क्षेत्रातील काही भागांवर उपवनसंरक्षक, गोंदिया व भंडारा तसेच वन विकास महामंडळ, भंडारा यांचे प्रशासकीय नियंत्रण होते. मात्र, व्याघ्र राखीव क्षेत्राचे व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हे सर्व बफर क्षेत्र क्षेत्र संचालक, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प यांच्या एकसंघ नियंत्रणाखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाअंतर्गत गोंदिया प्रादेशिक वन विभागातील ४१९.८९४ चौ.कि.मी., भंडारा प्रादेशिक वन विभागातील ६८.५६६ चौ.कि.मी., वन विकास महामंडळाकडील १३९.५१४ चौ.कि.मी., तसेच संरक्षित क्षेत्रात असून गाभा क्षेत्रात समाविष्ट नसलेले २०.७०४ चौ.कि.मी. क्षेत्र नव्याने नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्र व्यवस्थापनात समाविष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या बफर क्षेत्राच्या विस्तारात सडक अर्जुनी तालुक्यातील आदिवासी बहुल जांभळी, दोडके, लोधीटोलाअंतर्गत येणाऱ्या जंगलाचा मोठा भाग समाविष्ट झाल्यानें जंगलालगतच्या गावकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. बफर क्षेत्र घोषित झाल्यामुळे आपल्या पारंपरिक उपजीविकेवर निर्बंध येतील काय? अशी चिंता स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. गावकऱ्यांचे मते त्यांच्या उपजीविकेसाठी वापरली जाणारी बहुतांश शेती व वनसंपत्ती ही वनपट्ट्याशी संबंधित आहे. जंगलातील मोहफुल व इतर रानमेवा संकलन, पशुचारण व इतर वनाधारित व्यवसायांवर बंधने येण्याची शक्यता असल्याने उपजीविकेचे साधन धोक्यात येईल, अशी भीती त्यांना वाटत आहे. शिवाय शेती वनालगत असल्याने विविध निर्बंध येतील.अतिक्रमित शेती बफर झोन मधे जाईल, पशू चराऊ साठी मज्जाव करण्यात येईल.यासारखी शंका कुशंका ना पेव फुटले आहे. दरम्यान गावकऱ्यांमध्ये अफवाचे वातावरण पसरले असून प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी.

बफर झोनच्या विस्ताराबाबत प्रशासनाने स्थानिक नागरिकांची संवाद साधून त्यांच्या संकाचे निरसन करावे. अशी मागणी होत आहे.




**'दोडके, जांभळी व लोधी टोला ही गावे जंगलालगत असल्याने येथील बहुताश कुटुंबाची उपजीविका जंगलावर अवलंबून आहे बंपर क्षेत्र झाल्याने हक्काच्या व्यवसायावर गदा येईल. या सारख्या पारंपारिक कामावर निर्बंध येतील का याची भीती आहे.**

**- शालिंदर कापगते , पंचायत समिती सदस्य**

**'घरगुती जलाऊ लाकडे बंद होणार कुराळ बंदी गाय चराईबंदे जंगलातील महा फुले वेचणे बंदी तसेच जंगलापासून होणारे उत्पन्न बंद होणार जंगलात प्राणी वाढल्यावर मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होणार वीट भट्टी व्यवसाय असे अनेक अडचणींना गावकऱ्यांना सामोरे जावे लागणार. जंगलालगतच्या गावांतील नागरिक अफवांनी अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळे गावनिहाय स्पष्ट नकाशे, क्षेत्रफळ व बफर झोनमुळे होणारे परिणाम याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. पारंपरिक उपजीविकेच्या संरक्षणाची लेखी हमी मिळावी. मानवी हक्क व अधिकारांवर गदा येऊ नये. संबंधित ग्रामपंचायतींशी चर्चा करून पुढील निर्णय घ्यावेत.'**

**– विजयकुमार सोनवणे, उपसरपंच जांभळी (दोडके)**

## संघटन शक्ती हेच समृद्ध भारताचे मूलमंत्र : प्राचार्य पाऊलझगडे




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोर :** जयदुर्गा हायस्कूल एवं जुनियर कॉलेज गौरनगर च्या वतीने व ग्रामपंचायत कोरंबी च्या पुढाकाराने आयोजित सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन जि. प. प्रा. शाळा कोरंभी येथे करण्यात आले असून शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सरपंच मेळाव्याला संबोधित करताना संघटन शक्ती हेच समृद्ध भारताचे मूलमंत्र आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य सुनीलकुमार पाऊलझगडे यांनी केले.

या कार्यक्रमादरम्यान गावाचे सरपंच सुनील टेंभुर्णे, किशोर ब्राह्मणकर सरपंच ग्रामपंचायत जाणबा, श्रीकांत लोणारे सरपंच वडेगाव रेल्वे, आनंदरावजी सोनवणे सरपंच येगाव, कोणमनोनी कीर्तूनया सरपंच ग्रामपंचायत अरुणनगर, जितेंद्र जी तुमराव उपसरपंच बोळडा करड, एकनाथ लंजे माजी उपसरपंच कोरंबी, जी. एस. कापगते मुख्याध्यापक जि. प. प्रा. कोरंभी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपविभागीय अधिकारी व दंडाधिकारी ज्योती कांबळे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन शिबिर संयोजक संघदीप कांबळे यांनी केले तर ममता लंजे यांनी मान्यवरांचे आभार मानले.

## २५ दिवसीय राजनंदनी गोमातेचे आमगाव नगरीत भव्य स्वागत



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**आमगाव :** स्थानीय श्री गुरुदेव गौसेवा समिती धानोली तर्फे श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने दिनांक १५- १२ -२०२५ ते दिनांक १४- १- २०२६ पर्यंत सालेकसा व आमगाव तालुक्यात राजमाता राजनंदनी गोमातेच्या रथ यात्रेची सुरुवात करण्यात आली होती ती यात्रा साले कसा तालुका तून पूर्ण करून आज आमगाव नगरीत आगमन केले ही यात्रा भजन मंडळीच्या सहवासात रेल्वे स्टेशन पासून शुभारंभ करण्यात आली शुभारंभ करतांनी अनेक मान्यवर उपस्थित होते ती यात्रा आंबेडकर चौक पासून कामठा चौक -बनिया मोहल्ला - ते रणचोक येथे समापन करण्यात आली. गौमाताच्या स्वागताकरिता अनेक भाविकांनी पूजेची थाळी आणून पूजा अर्चना करण्यात आली यात्रेत गौमातेच्या समाज उपयोगी , पर्यावरण संबंधी महत्त्व सांगण्यात आले कार्यक्रमाच्या समापन प्रसंगी दिनांक १४ -१ -२०२६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जयंती निमित्त ५०१ गौमाते ना सामूहिक भोजनदान करण्यात येणार असे समितीने सांगितले रथयात्रेच्या सफलते करिता शामू मेश्राम , रामलाल रक्तसिंगे, मोहन टेंबरे ,नन्हालाल गौतम ,चंदन राणे इंद्रपाल टेंबरे ,सुरज मळावी ,सिताराम मेश्राम, जयाबाई दिहारी ,आनंदाबाई मेश्राम, गीता मेश्राम ,दुर्गा कटरे ,सुगरताबाई दिहारी ,इमलाबाई कटरे ,कृष्णकुमार कटरे ,गुड्डू भाऊ पारधी, व भजन मंडळी इत्यादी समूह याणि सहयोग केले.

## नैसर्गिक शेती काळाची गरज : सुलक्षणा शिंदे



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोर :** नैसर्गिक शेती काळाची गरज आहे आणि आपल्या अस्तित्वाकरिता शेती वाचविणे अत्यंत आवश्यक आहे. पूर्वीच्या काळी होत असलेली नैसर्गिक शेती आज मागे पडली असून रासायनिक खतांच्या अत्याधिक वापराने जमीन मरत आहे आणि ही बाब अत्यंत धोकादायक असल्याचे मत तालुका कृषी अधिकारी सुलक्षणा शिंदे यांनी व्यक्त केले. सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिरादरम्यान त्या बोलत होत्या.

राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे मौजा दाभणा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर सुरू आहे. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांकरिता उद्बोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या अंतर्गत ४ जानेवारीला सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता केली व दुपारच्या सत्रात सेंद्रिय व नैसर्गिक शेती आव्हाने व उपाय या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता तालुका कृषी अधिकारी सुलक्षणा शिंदे व प्रमुख वक्ते म्हणून नीता ओमकार लांजेवार प्रामुख्याने उपस्थित होते. नीता लांजेवार यांनी आपल्या व्याख्यानातून सेंद्रिय शेतीचे महत्व विशद केले. उल्लेखनीय बाब म्हणजे नीता लांजेवार या परिसरात प्रगतशील शेतकरी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी मागील पाच वर्षापासून आपल्या छोट्याशा फार्म हाऊस च्या माध्यमाने परिसरात सेंद्रिय शेतीचे महत्व समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्याकडील अंबाडी व कुकसा भाजी मुंबई पर्यंत पाककले सहित पोहोचली आहे. सेंद्रिय शेती विषयी त्यांना आलेल्या समस्या व त्यावरील त्यांनी शोधलेले उपाय उपस्थिताना समजावून सांगितले. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख अतिथी टी. एस. बिसेन यांनी सेंद्रिय व नैसर्गिक शेती आपल्या आरोग्य करिता पर्याय नसून गरज बनल्याचे सांगितले. तसेच ओमकार लांजेवार यांनी विद्यार्थ्यांना परिसरात असलेली वैविध्यता च्या माध्यमाने निसर्गाशी जुळवून घेण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुलक्षणा शिंदे यांनी विदर्भातील भंडारा गोंदिया जिल्ह्यात वंशपरंपरागत रीतीने मोहाच्या फुलांपासून तयार होणारी राब चा उल्लेख करीत उपस्थिताना नैसर्गिक शेती म्हणजे काय याची जाणीव करून दिली. अन्नसाखळीच्या सर्वोच्च स्थानापासून तळापर्यंत कुठलाही घटक जर बदलला वा संपला तर त्याचे दूरगामी परिणाम मानवावर होणे अपेक्षित आहे. यामुळे सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला तरणोपाय नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर मध्ये मार्गदर्शनाबद्दल अतिथींचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन विद्यार्थिनी रचना गहाणे ने केले तर आभार प्रदर्शन कस्तुरी बागडे या विद्यार्थिनीने मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता राष्ट्रीय सेवा योजना च्या सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

## वीर एकलव्य जयंती व सभामंडपाचे लोकार्पण

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोरगाव :** तालुक्यातील सिलेझरी येथे ४ जानेवारी ला १२ वाजे एकलव्य मैदान सिलेझरी येथे एकलव्य स्मारक समिती, मत्स्य महिला बचत गट, एकलव्य पुरुष बचत गट व ढिवर समाज यांच्या संयुक्त विद्यमाने वीर एकलव्य जयंती कार्यक्रम चे उदघाट्न व माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या सांभामडप चे लोकार्पण उमराव मांढरे संयोजक संघर्ष वाहिनी गोंदिया यांच्या हस्ते तर सदाशिव वलथरे माजी उपाध्यक्ष भंडारा डी. को. ऑफ बँक यांच्या अध्यक्ष ते खाली संपन्न झाला. कार्यक्रम चे सहउदघाटक म्हणून परेश दुरुगवार संघर्ष वाहिनी, सुखदेव मेंढे उपसरपंच तर दीप प्रज्वलक म्हणून लताताई भेंडारकर सरपंच, शालूताई कोल्हे निमगाव, द्वजारोहक/झेंडा वंदन केशवं कोल्हे कार्याध्यक्ष समाज संघटना यांच्या हस्ते तर प्रमुख उपस्थित म्हणून सचिन डोंगरे सरपंच चान्ना, प्रकाश टेम्भूरणे माजी सरपंच, आत्माराम गोपे ग्रा. प. सदस्य, राजकुमार शहारे ग्रा. प. सदस्य देवराम शिंदे लाईनमेन, दिनेश उईके पो. पा., पी. ए. नदेश्वर मा. पो. पा, शिल्पाताई हेमने ग्रा. प. सदस्य, छायाताई मेश्राम ग्रा. प. सदस्य, सुनितताई ब्राम्हणकर मा. सरपंच, संतोष नैताम यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. ढिवर समाजाची आर्थिक परिस्थिती अतिशय खराब असून मुरमुरे विकणे, चणे विकणे व इतर धदे मोडकलीस आले आहेत. गोंदिया जिल्हा परिषदे ने मामा तलाव वर मोठया प्रमाणात मासेमारी साठी लिज आकारली असून तेवढी लिज संपूर्ण महाराष्ट्र मध्ये कोणत्याच जिल्हा परिषद व नगर परिषद, महानगर पालिकेने आकारले नाही ती लिज जिल्हा परिषदे ने कमी करून तलावाची मोजणी करून अतिक्रमण काढावे व संरक्षण भित तयार करावे अशी मागणी उदघाट्नय भाषणातून संघर्ष वाहिनी चे संयोजक उमराव मांढरे यांनी केले. कार्यक्रम चे संचालन मारोती गोपे, कार्यक्रम चे प्रास्ताविक ओमराज गोपे तर आभार श्रीपत गोपे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी ते साठी दीपक गोपे, श्रीकृष्ण गोपे, पिसाराम गोपे, आकाश गोपे, विलास मेश्राम, मदन गोपे, चंद्रभान गोपे, दिलीप गोपे, अरुण गोपे व संपूर्ण ढिवर समाज सिलेझरी यांनी केले. कार्यक्रम ला परिसरातील ढिवर समाजा तील लोक मोठया संख्येने उपस्थित होते.



## विलास लिल्हारे माध्यमिक शिक्षक यांचे सपत्नीक सत्कार

### लिल्हारे सरांची सेवा आदिवासी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रेरणादायी : प्राचार्य कमल कापसे

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**देवरी :** शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा पुराडा येथील माध्यमिक शिक्षक विलास लिल्हारे यांचे सेवानिवृत्तीपर सत्कार कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरुन बोलताना प्राचार्य कमल कापसे म्हणाले की लिल्हारे सरांची सेवा ही आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी होती, त्यांनी सलग ३३ वर्षे आदिवासी विकास विभागात अत्यंत दुर्मिळ व नक्षलग्रस्त क्षेत्रात समर्पित भावनेने सातत्याने आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक सेवा केली ही मोलाची कामगिरी सदैव स्मरणात ठेवण्यासारखी आहे असे प्रतिपादन शासकीय आश्रम शाळा पुराडा येथील सत्कार कार्यक्रमाच्या प्रसंगी केले.

विलास लिल्हारे सर यांचे नियत वयोमानानुसार दि.३१/१२/२०२५ ला सेवानिवृत्तीनंतर सपत्नीक शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व विविध भेटवस्तू देऊन प्राचार्य कमल कापसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी शा.व्य.समीती अध्यक्ष श्रीकृष्ण टप्पे, अधिक्षक अजय सोनुले, प्रा.राजेश हट्टेवार, प्रा.वैजंती नेनावत, प्रा.मेघा धोपटे, सुजाता मेश्राम, राजु भक्ता, विजय टेंभरे, कु.बैस, रक्षपाल लिल्हारे, डि.डि.तावाडे, चंदना नेवारे, हर्षवर्धन दवने यांनी लिल्हारे सरांविषयीच्या अत्यंत गोड प्रसंगांना उजाळा देत सर्वांना सहकार्य देणारा व कुबेर वाहीनीचा गाढा अभ्यासक पंडित अशा उपमा देत गौरवान्वित केले, तसेच लिल्हारे सरानी आपल्या कार्यकाळात केलेल्या समर्पित सेवेस, नेतृत्वाला आणि शिक्षण क्षेत्रात दिलेल्या बहुमोल योगदानाला मनापासून शुभेच्छा देऊन सरांनी घडवलेली शेकडो आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात आणि शिक्षक सहकाऱ्यांमध्ये निर्माण केलेली एकता, सदैव प्रेरणादायी राहील असे सांगितले. सर्वांनी लिल्हारे सरांच्या जीवनातील या नव्या पर्वात सुख, समाधान, उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य आणि आनंद लाभो अशा शुभेच्छा दिल्या. विलास लिल्हारे सरानी आपल्या बालपणापासून तर सेवानिवृत्ती पर्यंत च्या जिवनातील आलेल्या गोड कडू उतार चढावाचे अनेक प्रसंग सांगत आपली जिवनगाथा मांडली. सत्कार समारंभ प्रसंगी उपस्थित लिल्हारे सरांच्या संपूर्ण नातेवाईकांना याप्रसंगी गौरविण्यात आले, कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्राध्यापक संदिप बिसेन यांनी केले तर आभार प्रदर्शन मोरेश्वर धवने यांनी केले.



## सालेकसा एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयात कायमस्वरूपी अधिकारी द्या

### उपसभापती जितेंद्र बल्लारे यांची मुख्य कार्यपालन अधिकारीकडे मागणी
### १८७ अंगणवाडीचा डोलारा, महिला प्रभारी च्या खांद्यावर
### आदिवासी भागातील अंगणवाड्या एक वाजेच स्विच ऑफ




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** महिला व बालकल्याण विभाग मंत्रालय मुंबई द्वारा महाराष्ट्र मध्ये ३६ जिल्ह्यामध्ये महिला बालकल्याण विभाग कार्यान्वित आहे तसेच गोंदिया महिला बालकल्याण जिल्हा परिषद अंतर्गत सालेकसा तालुका हा आदिवासी व मुख्यालयापासून जवळपास ३० ते ४० किलोमीटर दूरवरून गावे व अंगणवाडी आहेत परंतु प्रत्यक्षात शासकीय कार्यालयाकडून महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी प्रत्यक्षात दौरे करत नाही व कार्यालयात बसूनच दौरे दाखवून बिलही काढले जात आहेत व येथील एकात्मिक बालविकास योजना महिला व बालकल्याण कार्यालयातील स्थानिक कर्मचारी हे मुख्यालयात रहात नाही आधीच शासनाने पाच दिवसाचा आठवडा केल्याने प्रत्यक्षात गृहभेटी दिले जात नाही व सोमवार ते शुक्रवार पर्यंत महिला बालकल्यान विभागाचे कर्मचारी हे दुपारी ११ ते १२ वाजे. यने व सायंकाळी ३ , ते चार वाजे निघून जाणे ही त्यांची सवय पडलेली आहे आजही शासन निर्णयाप्रमाणे दोन ते तीन टक्के शासकीय कर्मचारी हे मुख्यालयात राहतात परंतु उर्वरित शासकीय कर्मचारी हे आमगाव गोंदिया भंडारा देवरी तुमसर तिरोडा नागपूर लाखनी येथून अपडाऊन मध्ये व्यस्त असतात शनिवार दिवशी पूर्णपणेच शासकीय कर्मचारी हे महिला बालकल्याण विभागाचे अधिकारी अंगणवाडी मध्ये प्रत्यक्षात भेट देत नाही साले कसा तालुक्यात जवळपास सात बिट व १८७ अंगणवाड्या आहेत.

**प्राप्त माहितीनुसार बीजेपार येथील अंगणवाडी पर्यवेक्षिका व प्रभारी महिला बालविकास अधिकारी हे पद गट ब व महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक ९०/,का-अ, ७,दिनांक २८ ५ २०१५ च्या नुसार सालेकसा पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी पद हेसुद्धा गट, ब नुसार कार्यरत आहेत मग पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात काय हरकत असेल असाही सवाल उपस्थित होत आहे तसेच महिला बालकल्याण विभागाच्या कार्यालयात कनिष्ठ सांख्यिकी विभागात पद भरले गेले नाही हे पद सुद्धा गेल्या दोन ते तीन महिन्यापासून रिक्त आहे सदर कायमस्वरूपी पद भरती करण्यात यावी असे मागणी जितेंद्र बल्लारे यांनी मुख्य कार्यपालन अधिकारी तथा महिला बालकल्याण उपमुख्य कार्यपालन अधिकारी यांच्याकडे केली आहे.**

**प्राप्त माहितीनुसार सालेकशा तालुक्यात , ०७ बिट आहेत यामध्ये दरेकसा रोंढा सातगाव बीजे पार तिरखेडी लटोरी कावराबांध व १६७८७ अंगणवाड्यांच्या समावेश आहे तसेच मागील दोन वर्षांपासून कायमस्वरूपी बाल विकास अधिकारी नसल्यामुळे बऱ्याच अंगणवाड्यामध्ये प्रत्यक्ष गृहभेटी होत नाही व बीजेपार येतील पर्यवेक्षिका सुपरवायझर यांच्याकडे सालेकसा महिला बाल विकास सेवा सेवा, योजना कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे ते पाच वर्षापूर्वी तिरोडा तालुक्यात अँटी करप्शन ब्युरो ची कारवाही त्यांच्यावर करण्यात आली होती त्यांना सालेकशा तालुक्यात पाठवले होते मग असे अधिकाऱ्यांना महिला व बालकल्याण कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार का बर दिला जात आहे, असा संतप्त सवालही पंचायत समितीचे उपसभापती जितेंद्र बल्लारे यांनी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडे, लेखी, पत्र दिला आहे.**

**जाहीर सुचना**

श्री. अ. करीम खान व लतीफ खान पठान इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. ९, वार्ड का नाम जोगलेकर संजयनगर वार्ड, मालमत्ता क्र.७७ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.११/६/२०२३ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) अब्दुल सलीम अब्दुल करीम खान इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

युवाराष्ट्र दर्शन
(७)
# वर्धा
मंगळवार, ०६ जानेवारी २०२६
जिल्हा




## ग्रामोद्योग सशक्त करणारी एमगिरी ही एक अग्रगण्य संस्था – केंद्रीय राज्यमंत्री करंदलाजे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती शोभा करांदलाजे यांनी दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्था (एमगिरी), वर्धा येथे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा तसेच नवीन प्रकल्पांचा आढावा घेतला. केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आढावा बैठकीस एमएसएमई मंत्रालयाचे संयुक्त सचिव विपुल गोयल, संचालक अशोक शर्मा, जिल्हाधिकारी वान्मथी सी., विजय देशमुख मुख्य कार्यकारी अधिकारी एमगिरीचे संचालक डॉ. आशुतोष मुरकुटे उपस्थित होते.

देशात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामोद्योग सशक्त करण्यासाठी तसेच ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीस चालना देण्याच्या दृष्टीने महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. महात्मा गांधींच्या ग्रामोद्योगावर आधारित सशक्त भारत निर्मितीच्या संकल्पनेला एमगिरी साकार करत आहे. देशभरातील हजारो कारागीर, महिला, शेतकरी, युवक, खादी संस्था व गोशाळा एमगिरीद्वारे विकसित करण्यात आलेल्या तंत्रज्ञानाचा लाभ घेत आहेत. वरील उद्गार केंद्रीय राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी ५ जानेवारी रोजी एमगिरी येथे आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

यावेळी एमगिरी परिसरात एमएसएमई मंत्रालय व श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या केंद्रीय राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांच्या हस्ते 'विश्वकर्मा भवन व गांधी वारसा पथ' या बांधकाम प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. एमगिरी परिसरातील महात्मा गांधींशी संबंधित तीन प्रमुख वारसा संरचना — गांधी स्मृती भवन, कस्तुरबा स्वयंपाकघर आणि वर्धा हाट — यांच्या जीर्णोद्धारातून विश्वकर्मा भवन व गांधी वारसा पथ उभारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी सांगितले की, एमगिरीच्या सर्वांगीण विकासासाठी जनसहभागिता सातत्याने सक्रिय आहे. त्यांनी उल्लेख केला की, ही भूमी महात्मा गांधींशी निगडित असून गांधीजी येथे दोन वर्षे वास्तव्यास होते. त्यांची ग्रामाभिमुख विचारसरणी, ग्रामीण उद्योग व स्वावलंबनाची संकल्पना याच परिसरातून विस्तारास सुरुवात झाली. बापूकुटी, सेवाग्राम आणि ही संस्था स्वदेशी, आत्मनिर्भरता व सामाजिक समरसतेच्या गांधीजींच्या विचारांची सजीव केंद्रे असून एमगिरी भविष्यातील पिढ्यांसाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरेल, असेही त्यांनी सांगितले.तसेच, देशभरातील विविध राज्यांतील एमगिरीशी संबंधित व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. महात्मा गांधी यांनी १९३४ ते १९३६ या कालावधीत सेठ जमनालाल बजाज यांनी दान दिलेल्या मगनवाडी, वर्धा येथील जमिनीवर वास्तव्य करत अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ ची स्थापना केली होती.

या काळात त्यांनी ग्रामोद्योग संशोधन, प्रशिक्षण, उत्पादन व प्रचार यामध्ये स्वतः सक्रिय सहभाग घेतला. आज केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या हस्ते ज्या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले आहे, त्या अंतर्गत गांधीजींच्या निवासस्थानाचा संग्रहालय व प्रार्थनागृह म्हणून विकास करण्याची योजना प्रत्यक्षात आणली जात आहे. या प्रकल्पात संरचनात्मक दुरुस्ती, ऐतिहासिक दस्तऐवज व संग्रहांचे डिजिटायझेशन तसेच गांधीजींच्या विचारांचे दर्शन घडवणाऱ्या इंटर?क्टिव्ह प्रदर्शनांची उभारणी करण्यात येणार आहे. ही प्रदर्शने एआर–व्हीआर तंत्रज्ञानयुक्त असतील. यासोबतच स्वतंत्र ध्यान केंद्र उभारण्याचाही समावेश आहे.

कस्तुरबा स्वयंपाकघर — जिथे पूर्वी आश्रमवासीय व अतिथींसाठी भोजन तयार केले जात असे — याचे मूळ स्वरूप जपून जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. तसेच १९३६ साली गांधीजींनी उद्घाटन केलेल्या ऐतिहासिक वर्धा हाट या बाजाराचे जीर्णोद्धार करून विश्वकर्मा भवन (कारागीर संकुल) विकसित करण्यात येणार आहे. येथे देशभरातून येणाऱ्या कारागिरांसाठी कौशल्यवृद्धी व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. गांधी संग्रहालयापासून वर्धा हाटपर्यंत गांधी वारसा पथ विकसित करण्यात येणार असून, त्याअंतर्गत बारा बलुतेदार परंपरेतील कारागीर — सुतार, लोहार, कुंभार, गवंडी, विणकर आदींच्या प्रतिमा उभारण्यात येतील. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उभारण्यात येणाऱ्या वास्तूंचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले.एमगिरीचे संचालक डॉ. अशुतोष मुरकुटे यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी एमएसएमई मंत्रालय व वित्त मंत्रालयाकडे सातत्यपूर्ण प्रयत्न केले. कार्यक्रमास एमएसएमई मंत्रालयाचे संयुक्त सचिव विपुल गोयल, जिल्हाधिकारी, इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्र, नवी दिल्ली, एनबीसीए, डीसीएमएसई व केव्हीआयसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व समारोप वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयकिशोर छांगाणी यांनी केले.

# उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्या - पालकमंत्री डॉ. भोयर

### सेलू तालुक्यातील संभाव्य पाणी टंचाई आढावा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

सेलू तालुक्यातील संभाव्य पाणी टंचाई आराखड्याचा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आढावा घेतला. येत्या उन्हाळ्यात तालुक्यात कुठेही टंचाईची परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता. आराखड्यातील प्रस्ताव वेळेत सादर करून वेळेत त्यावर कारवाई करा, असे निर्देश बैठकीत पालकमंत्र्यांनी दिले.

सेलू पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित बैठकीत पालकमंत्री बोलत होते. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, तहसिलदार शकुंतला पाराजे, गट विकास अधिकारी देवानंद पाणबुडे, पंचायत समितीचे माजी सभापती अशोक मुडे यांच्यासह पाणी टंचाईशी संबंधित विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.प्रत्येक कुटूंबातील व्यक्तीला पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे. यासाठी केंद्र व राज्य शासनाच्यातीने विविध योजना राबवून प्रत्येक नागरिकाला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सुरळीत पाणी पुरवठ्यासाठी योजना राबविणाऱ्या यंत्रणांनी संयुक्तपणे टंचाई आराखडा राबवावा, डॉ.भोयर यांनी सांगितले.दरवर्षी टंचाई आराखड्याचे नियोजन आपण करतो. त्याप्रमाणे प्रस्ताव, मान्यता व प्रत्यक्ष कामे होणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी तातडीने कामे करणे आवश्यक आहे, तेथे




**सेलू येथील विविध विकास कामाचे भूमीपूजन**

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते सेलू येथील प्रभाग क्रमांक ६, १४ व १६ मधील सिमेंट रस्ता व खुल्या जागेतील सौदर्यीकरण व कुंपन बांधकामे अशा २७ लाख रुपयाच्यां कामांचे भूमीपूजन करण्यात आले. यावेळी सेलू नगर पंचायतच्या नगराध्यक्ष स्नेहल देवतारे, मुख्याधिकारी अनुप अग्रवाल व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आराखड्यासाठी वेळेत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश**

पाणी टंचाई आराखडा तयार करतांना वाढीव लोकसंख्येचा विचार करावा. गावातील सार्वजनिक व खाजगी विहिरी, हातपंप, नळयोजनांच्या दुरुस्तीची कामे प्रस्तावित करावी. जलजीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेली अपुर्ण कामे तत्काळ पुर्ण करण्याच्या सूचनाही यावेळी पालकमंत्री डॉ.भोयर यांनी यावेळी केल्यात.

उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच कामे होणे आवश्यक आहे. वेळेत काम न झाल्याने टंचाई परिस्थिती निर्माण झाली, असे होऊ नये. याबाबी पाहण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची असेल, असे पालकमंत्री म्हणाले. बैठकीला सेलू तालुक्यातील सर्व ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी, सरपंच व तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

## मतिमंद बालक देवाचा अवतार नसून त्यांना संधीची गरज आहे - डॉ. कांबळे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

मानवाच्या उत्क्रांतीनंतर अनेक बदल व प्रगती मानवानेच केली पूर्वी गतिमंद,व इतर प्रकारच्या दिव्यांगाना देवाचा अवतार किंवा मागील जन्मी आपण काहीतरी पाप केले असेल म्हणून आपल्याला कुटुंबात असे बाळ जन्मास आले असा गैरसमज होता , इटालीतील जुवापाब्लो,व जोमार्क इटार्ड सारख्या संशोधकांनी यावर अनेक कार्य केले व गतिमंद व्यक्ती देवाचा अवतार नसून त्यांची बुद्धिमत्ता इतरांपेक्षा कमी आहे असे ते पटवून द्यायचे मात्र त्यावेळची कट्टर धार्मिकतामुळे त्यांना शिक्षा दिली ,आत्ता गतिमंदत्व व औटीझमचे प्रमाण वाढत आहे त्या करीता पालकांनी योग्य तपासणी व दिव्यांगत्व असलेले बाळ जन्मास येण्याची कारणे जाणून घेणे गरजेचे आहे. यामुळे गतिमंदत्व असलेली बालके जन्मास येण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल ,या करिता नर्स ही महत्वाचे दुवा असून गरोदर मातेला नोंदणी करीता आल्यावर योग्य मार्गदर्शन केल्यास गतीमन्द बलक जन्मास येन्यापासुन रोकथाम होण्यास मदत असून गतिमंद बालक देवाचा अवतार नसून त्यांना संधीची गरज आहे असे विचार डॉ नरेंद्रकुमार कांबळे यांनी वेक्त केले दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी कार्मेल गतिमंद विद्यालयात राधिका बाई मेघे नर्सिंग कॉलेज च्या विद्यार्थ्यांनि माहिती जानून घेण्य करीता कार्मेल मतिमन्द विद्यालयात भेट दीली या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर रीनी व शालीनी ताई मेघे नर्सिंग कॉलेजचे प्रा सागर भौउरे, व डॉ नरेंद्रकुमार कांबळे या प्रसंगी उपस्थित होते या प्रसंगी एकून ७५ विद्यार्थ्यांनि शाळेच्या बलकांशी संवाद साधला कार्यक्रमचे संचालन राजू वाघमारे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वी करीता सिस्टर अनुपा,सिस्टर,अनुग्रहा, सिस्टर मरिया,दशरथ गवळी यांनि सहकार्य करून उपक्रम यशस्वीरीत्या सम्पन्न केला

## मॉडेल महाविद्यालयात सांस्कृतिक महोत्सवात गुणवंतांचा सत्कार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ५**

मॉडेल कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षिस समारंभ आणि सांस्कृतिक उत्सव रोशन मंगल कार्यालय येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्रवीण पावडे,प्रमुख अतिथी भारत व कृषक संस्थेच्या अध्यक्षा अँड.शोभा काळे, अ?ड.प्रकाश धारपुरे, माजी प्राचार्य प्रा अभय दर्भे,माजी प्रा चंद्रकांत पाटील,प्रा गोपाल निनावे, माजी विद्यार्थी आशिष माहुरे, प्रा. अनुराधा काळे, प्रा सुरेंद्र मेघे,प्रा नितीन ठाकरे , प्रा. निलेश पांढरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते हस्तलिखिताचे विमोचन करण्यात आले.

२०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेमध्ये व विषयामध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व



रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देत मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. माजी विद्यार्थी आशिष माहुरे यांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अँड.शोभा काळे यांनी वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चालना मिळते. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचा विकास करावा असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा अभय दर्भे यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या.प्रकाश धारपूरे यांनी विद्यार्थ्यांना काळ व परिस्थितीनुसार कौशल्य विकसित करा असे सांगितले. प्रा. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी आशिष माहुरे यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून ते ध्येय प्राप्त करण्याकरता पुढील तयारी करावी असा सल्ला दिला. सांस्कृतिक कार्यक्रमात पोवाडे, लोकनृत्ये,नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा.मनोज नेवले यांनी केले तर आभार प्रा.माळोदे यांनी मानले.कार्यक्रमाला पालक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## आनंद कॉलेज येथे सावित्रीबाई जयंती साजरी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वायफड, दि. ०५**

-स्थानिक आनंद कॉलेज येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्या वर्षा कांबळे यांनी दीपप्रज्वलीत करून प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या भाषणात 'सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यामुळे मी आज प्राचार्य पदावर विराजमान होऊन कार्य करीत आहे. हे या महामानवामुळे व सावित्रीबाई यांनी जे १५० वर्षा पूर्वी केले ते शब्दात सांगण्यापलीकडे आहे. आज सावित्री शिकली नसती तर आपण स्त्रिया कुठे असतो? असे प्रतिपादन केले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रशांत वैद्य नोडल अधिकारी यांनी तर आभार प्रा. उमेश भगत यांनी मानले. कार्यक्रमकरिता महाविद्यालयाचे प्रा. छगन तिरपुडे, प्रा. प्रमोद सातपुते, प्रा मंगेश जीवणे, प्रा. आकाश पाटील, प्रा सविता चौधरी ,प्रा रेणुका कडपते आदी विद्यार्थी उपस्थित होते.

## जंगली रानडुकराचा उद्रेकाने शेतकरी हैराण, रात्रभरात उभे पिक उध्वस्त

### तुरीचे पीक जंगली रानडुकरांनी व रोह्यांनी केले फस्त



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी (श), दि. ०५**

तालुक्यात अनेक गावे जंगलाला लागून डोंगराळ भागात वसले असून याच डोंगराळ भागाला बहुतांश शेतकऱ्यांची शेती आहे. परिसरात जंगली श्वापदांनी हैदोस घातला असुन शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे. रानडुक्कर व रोही शेतातमध्ये धुडगुस घालत शेतपीक रात्रभरात उध्वस्त करत असल्याने शेती कशी करावी असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे.

दिवसेंदिवस रोही रानडुक्कर या जंगली श्वापदांनी शेतक-यांचे जगणे कठीण केले आहे. या प्राण्यांचा शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांवर मारा होत असल्याने शेतात असलेले पीक तुर , सोयाबीन, कपाशी, ज्वारी हरभरा यासह इतर पिके रात्रभरात उध्वस्त करत आहे. शेतात जंगली जनावर येऊ नये म्हणून यावर उपाय म्हणून झटका बॅटऱ्या लावल्या मात्र या झटका बॅटऱ्यानाही श्वापदे जुमानत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. ` पीक वाचवण्याकरिता रात्रभर शेतात जागलीला जाऊन पीक वाचवण्याचे प्रयत्न करीत आहे. मात्र हिंस्त्र प्राणी वाघ ,बिबट, अस्वल यांचे प्रमाण वाढल्याने शेतकऱ्यांना दिवसाढवळ्या या हिंस्त्र प्राण्यांचे दर्शन होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीला जागलीला जाणाऱ्या शेतकऱ्यांनी जागलीला जाणे बंद केले त्यामुळे जंगली रानडुक्कर, रोही हे रात्रीला येऊन शेतातील पिके उध्वस्त करीत आहे दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या पिकाची नुकसान वाढीवर आहे.

एका शेतकऱ्याच्या शेतातील तूर रात्रभऱ्यात रानडुकरांनी व रोहिणी खाऊन फस्त केली. पीक काही दिवसात काढायला येणार या आशेत असलेल्या शेतकऱ्याचे पीक एका रात्री श्वापदांनी उद्धवस्त केल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा असा प्रश्न शेतक-यापुढे निर्माण झाला आहे.

**मिळणारी नुकसान भरपाई तुटपुंजी**

तालुक्यातील बोरखेडी,बांबरडा, थार, चांमला, किन्ही, मोई मुबारकपूर, पोरगव्हान, पंचाळा असे काही गावे आहेत की या गावातील शेती करिता ओलिताची सोय नसल्याने येथील शेतकरी दुसरे पीक घेऊ शकत नाही त्यात पहिले पिक जंगली जनावरांनी उद्ध्वस्त केले की त्यांनी खायचे काय ? शेती करिता कर्ज काढून किंवा बाहेरून आणलेला पैसा परत करायचा कसा असा प्रश्न शेवटी शेतकऱ्यांसोबत निर्माण होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती ढासळलेली आहे आणि झालेल्या लाखो रुपयाच्या पिकाची नुकसान भरपाई वनविभागाकडून तुटपुंजी मिळते त्या तुटपुंजी मदतीने शेतकऱ्यींसमोर जगावे कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## जुगार खेळणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची धडक

### ७६हजार ६८० रू चा मुद्देमाल जप्त



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

स्थानिक गुन्हे शाखा पथकाने जुगार व्यवसाय खेळणाऱ्या आरोपींविरुध्द राबविलेल्या मोहिमेदरम्यान शहर हद्दीतील नवदुर्गा बॉलिंग अली स्किल व्हिडिओ गेम पार्लरमध्ये रेड केला असता गेम पॉर्लरचा मालक भारत आमले हा त्याचे पॉर्लरमधील ईलेक्ट्रॉनिक मशिन व जुगार खेळण्याकरीता कलरचे बॉलींग गेम साहीत्याव्दारे जुगारचा हार-जीत चा व्यवसाय करीत असल्याचे माहितीवरुन छापा टाकला जुगार खेळवणारे नौकर व ग्राहक असे जुगार खेळतांना मिळुन आल्याने कारवाईदरम्यान प्लास्टीकचे कॉईन, वेगवेगळे कलरचे चौकडयांचा लाकडी चौकटीचा पाटा, जुगरातील रोख, दोन कंम्पुरटर, प्रिंटर, स्कॅनर, टेबलसह एकूण ७६हजार ६८० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी भारत कमलाकर आमले वय (४०) रा. हिंदनगर वर्धा, संघपाल इंद्रपाल डंभारे, वय (३० ) रा.गणेशनगर,,मनोहर खोब्रागडे, वय (५४) ,रा. हरिदासपेठ गणेशनगर,विकांत चंद्रशेखर समर्थ, वय (४८) रा. रामनगर वर्धा, इरफान सैय्यद महमुद, वय(४४)रा. सिध्दार्थ नगर चितोडा , लटारी राघव आत्राम, वय (५१) वर्ष, रा. वार्ड नं. ०१ दुर्गा माता मंदिर जवळ बोरगाव मेघे वर्धा, संदिप रामुजी आत्राम, वय (३४),रा. लाला लजपतराय शाळेजवळ चितोडा ,,सागर सुरेश जाधव, वय (२५), रा. पिंपरी पुनर्वसन सालोड,जितेंद्र विश्वनाथ आडे, वय (३२) रा. वायगाव (भोयर) जि. चंद्रपुर, नेल्सन अलेक्झांडर डिकुस, (५१), रा. बोरगाव वर्धा यांचेविरूध्द पो. स्टे. वर्धा शहर येथे जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंद केला. ही कारवाई पोलीस अधिक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा,पोलीस निरीक्षक , विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक बालाजी लालपालवाले, विजयसिंग गोमलाडु, ओमप्रकाश नागापूरे, सलाम कुरेशी, राहुल इंटेकर,कैलास सोनवणे, रोशन निबांळकर, अमरदिप पाटिल, अरविंद येणूरकर, अमर लाखे, राजु अकाली, अभिषेक नाईक, रवि पुरोहीत, हर्षल सोनटक्के, प्रफुल पुनवटकर, उदय सोलंखी, दिनेश करलुके, रितेश कुरडकर सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा यांनी केली.

